निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७२ वा.
शनिवार :०६ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## सौर ऊर्जेच्या वापरामुळे विजेच्या दरात कपात करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** महाराष्ट्र हा देशात शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जेचा सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले की, राज्य शासन शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जेवर आणून स्वतंत्र १६,००० मेगा वॅट वीज निर्मिती करणार आहे. या योजनेमुळे इतर वापरातील विजेच्या दरात दरवर्षी ३ टक्के कपात करून ग्राहकांना स्वस्त वीज उपलब्ध करून दिली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

**गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड: एक महिन्यात ४५,९११ सौर कृषी पंप**

'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेअंतर्गत महाराष्ट्राने एका महिन्यात ४५,९११ सौर कृषी पंप स्थापित करून जागतिक विक्रम गाठला. हा विक्रम गिनीज बुकमध्ये नोंदवण्यात आला असून, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रतिनिधी कार्ल सॅबेले यांनी याची अधिकृत घोषणा केली. हा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीतील ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या सोहळ्यात राज्याचे इमाव बहुजन कल्याण व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, विविध आमदार, महावितरणचे अध्यक्ष व अधिकारी तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.




मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सौर कृषी पंपाचे डिजिटल लोकार्पण करण्यात आले आणि शेतकऱ्यांशी दुरदूरस प्रणालीद्वारे संवाद साधला गेला. कार्ल सॅबेले यांनी विक्रमाची अधिकृत घोषणा करून प्रमाणपत्र व मेडल प्रदान केले. सौर कृषी पंप योजनेसाठी आर्थिक सहकार्य करणाऱ्या -खखच् बँकेसोबतच्या करारावरही स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

कार्ल सॅबेले यांनी सांगितले की, विक्रमासाठी ३५,००० पंपांची आवश्यकता होती, परंतु प्रत्यक्षात ४५,९११ पंप बसविण्यात आले, जे एक वास्तवविक्रम मानला गेला. प्रत्येक पंपाच्या उभारणीपासून कार्यान्वयनापर्यंत सर्व टप्प्यांची तपासणी करूनच हा विक्रम मान्यता मिळवू शकला.

महाराष्ट्राची पुढील योजना आणि सौर ऊर्जेचा विस्तार

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करताना, विजेच्या अडचणींमुळे शेतकऱ्यांना सिंचनात अडचण येत होती. दिवसाच्या वेळी विजेची उपलब्धता आणि रात्री शेतात जाण्याची सुरक्षितता या समस्या लक्षात घेऊन शासनाने शेतकऱ्यांचे फिडर सौर ऊर्जेवर नेण्याचे धोरण निश्चित केले. या योजनेत एक लाख सौर पंप बसविण्याचे लक्ष्य ठरवले असून, या योजनेमुळे इतर राज्यांनाही स्फूर्ती मिळाली आणि केंद्राने 'कुसूम' ही योजना तयार केली. आज महाराष्ट्राने देशात सर्वाधिक ७ लाख सौर कृषी पंप बसविले आहेत.फडणवीस म्हणाले की, पुढील वर्षभरात या पंपांची संख्या १० लाखांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच, सौर ऊर्जेद्वारे स्वतंत्र १६,००० मेगावॅट वीज निर्मिती करून इतर क्षेत्रातील विजेची उपलब्धता स्वस्त व मुबलक केली जाईल. या वीज निर्मितीमध्ये कोणताही प्रदूषण होणार नाही आणि खर्चही कमी असल्यामुळे ग्राहकांसाठी फायदेशीर ठरेल.

**रोजगार निर्मिती आणि ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा**

सौर ऊर्जेच्या या योजनांमुळे सौर ऊर्जा उपकरण निर्मिती कंपन्या, विक्रेते, कामगार, देखभाल करणारे यांना रोजगार मिळाला असून सुमारे १ लाख लोकांना फायदेशीर रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यामुळे ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा मिळाली असून, राज्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासही मदत झाली आहे.



**मराठवाड्याचा वाटा आणि शाश्वत शेतीसाठी प्रयत्न**

मराठवाड्याचे कौतुक करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या योजनेच्या अंमलबजावणीत मराठवाड्याने आघाडी घेतली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४ हजार पंप बसविण्यात आले आहेत. तसेच, नानासाहेब देशमुख कृषी संजिवनी योजनेमार्फत शेतकऱ्यांना अतिरिक्त लाभ, बाजार उपलब्धता देऊन शेती शाश्वत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नदी जोड प्रकल्पांद्वारे पूराचे पाणी मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात पोहोचवून दुष्काळ मुक्ती साधण्याचा मानस आहे. या सर्व उपाययोजनांमुळे शेती समृद्ध व शाश्वत होईल.राज्यमंत्री मेघना बोर्डीकर व मंत्री अतुल सावे यांनीही उपस्थितांना सांगितले की, सौर कृषी पंप योजनेमुळे शेती क्षेत्र व राज्याच्या अर्थकारणात मोठे बदल घडवून येतील. या ठिकाणी सौर ऊर्जा उत्पादन प्रदर्शनाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाहणी केली आणि त्याचे कौतुक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रास्ताविक लोकेश चंद्र यांनी केले, आभार नीता पानसरे यांनी मानले तर सूत्रसंचालन नीता पानसरे, आश्विनी दाशरथे, प्रेषित रुद्रावतार यांनी केले. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या सहभागामुळे सौर कृषी पंप योजनेचे महत्त्व आणि त्याचा राज्यासाठी सकारात्मक परिणाम स्पष्टपणे दिसून आला.या संपूर्ण उपक्रमातून दिसून येते की महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांसाठी समर्पित असून, शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून विजेचे दर कमी करणे, रोजगार निर्मिती करणे आणि शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे हाच त्यांचा प्राथमिक उद्देश आहे.

## संक्षिप्त

### राज्यातील वाळू घाटांचे लिलाव ३० डिसेंबरपर्यंत पूर्ण करा- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/वाळू घाटांच्या लिलावाकरिता पर्यावरण समितीकडून सर्व मंजुरी घेण्याची कार्यवाही पूर्ण करून राज्यातील वाळू घाटांचे लिलाव ३० डिसेंबरपर्यंत पूर्ण करा तसेच वाळू धोरणात घरकुल बांधणीसाठी देण्यात येणारी कार्यवाही गतीने करण्याच्या सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.



मंत्रालयात वाळू धोरणासंदर्भात बैठकआयोजित करण्यात आली होती.यावेळी या बैठकीत दूरदृश्यप्रणालीव्दारे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, राज्यातील सर्व महसूल विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, वाळू घाटांचे लिलाव विहित वेळेत होण्यासाठी महसूल अधिका-यांनी गतीने आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी. या लिलावासाठी पर्यावरण व महसूल विभागाने परस्पर सामंजस्य पध्दतीने काम करावे. पर्यावरण विभागाकडून मिळालेल्या परवानगीनंतर कोणताही विलंब न लावता वाळू घाटाचे लिलाव केले जावेत.वाळूचा अवैध उपसा व वाहतूक,चोरी होऊ नये यासाठी कायदेशीर काटेकोरपणे उपाययोजना कराव्यात अशा सूचनाही त्यांनी केल्या.महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी विभागनिहाय व जिल्हानिहाय वाळू धोरणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला.

## महायुती सरकारच्या एका वर्षातील मुख्य कामगिरी – महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या कार्यकाळात शाश्वत विकासाच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विस्ताराने दिली. त्यांनी स्पष्ट केले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने शेती, पायाभूत सुविधा, सिंचन, उद्योग, रोजगार निर्मिती, सामाजिक न्याय, सुरक्षा अशा विविध क्षेत्रांमध्ये क्रांतीकारी निर्णय घेऊन राज्याची प्रगती गतिमान केली आहे.



शेती क्षेत्रात सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ३२,००० कोटींचे पॅकेज जाहीर केले असून, दुष्काळी उपाययोजना राबवल्या आहेत. पीककर्ज वसुलीवर स्थगन देण्यात आले आहे, पीकविमा आणि भरपाई प्रक्रियेला वेग दिला आहे. याशिवाय पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसायास कृषीचा दर्जा देण्यात आले आहे, ज्यामुळे या क्षेत्रातील शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा मिळाली आहे. सिंचन क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी नदीजोड प्रकल्पांना मान्यता देऊन निधीची तरतूद करण्यात आली, तसेच उपसा सिंचन प्रकल्पांसाठी कोट्यवधींचे निधी मंजूर केले गेले. जलयुक्त शिवार २.० अंतर्गत ३७,१६६ कामे पूर्ण करण्यात आली, ज्यामुळे पिकांची क्षमता आणि जलसंपत्ती दोन्ही सुधारल्या आहेत.

पायाभूत सुविधा क्षेत्रात महायुती सरकारने मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करून राज्यातील यंत्रणा सक्षम करण्यावर भर दिला. समृद्धी महामार्ग पूर्णपणे खुला करण्यात आला असून, शक्तीपीठ महामार्ग, वाढवण बंदर, ऑफशोअर विमानतळ यांसारख्या प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले. १०० गावांत सौरग्राम योजना राबविण्यात आली आहे. नागपूरमध्ये राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था स्थापन करण्यात आली, तसेच मुंबई मेट्रो लाईन ११ ला मान्यता मिळाली. मुंबईत २३८ लोकल गाड्यांच्या खरेदीसाठी ४,८२६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून रेल्वे सेवा सुधारण्यासाठी कोट्यवधींचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महायुती सरकारने लाडकी बहिण योजना सुरू केली आहे. राज्यातील १० जिल्ह्यात महिला बचत गटांसाठी उमेद मॉल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. उद्योगक्षेत्रातील विकासासाठी नवीन औद्योगिक धोरण, इलेक्ट्रॉनिक्स धोरण, जेम्स अँड ज्वेलरी धोरण यांसारख्या योजनांची घोषणा करण्यात आली आहे. या धोरणांमुळे राज्यात नवीन रोजगारनिर्मिती आणि गुंतवणूक वाढीस लागली आहे. २०२४-२५ मध्ये महाराष्ट्रात परदेशी गुंतवणूक १,६४,८७५ कोटी रुपयांपर्यंत वाढली, जे मागील वर्षापेक्षा ३४ टक्के अधिक आहे.

सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जपण्यासाठीही महायुती सरकारने निर्णायक पावले उचलली आहेत. आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, पानिपतला मराठा शौर्य स्मारक उभारण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीवर्षानिमित्त तीर्थक्षेत्र विकासासाठी ५,५०३ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

सामान्य नागरिकांचे जीवन सुकर करण्यासाठी आणि जीवनमान उंचावण्यासाठी घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक वीजदरात आगामी पाच वर्षात कपात करण्याचे आदेश 'एमईआरसी'ने दिले आहेत. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत २,३९९ आजारांचा समावेश करण्यात आला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३० लाख घरे मंजूर झाली असून, ४,९१,२७८ घरे पूर्ण केली गेली आहेत. तुकडेबंदी कायदा शिथिल करण्यात आला आहे आणि ग्रामीण कुटुंबांना नळजोडणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## जालना - छपरा - जालना विशेष गाड्यांच्या रद्द

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**

जालना - छपरा - जालना मार्गावर चालणारी विशेष गाडी क्रमांक ०७६५१ / ०७६५२ ही काही दिवस रद्द करण्यात आली आहे. ही गाडी तांत्रिक कारणांमुळे रद्द करण्यात आली आहे, त्यामुळे प्रवाशांनी त्यांचा प्रवास योजताना याची नोंद घेणे आवश्यक आहे. गाडी रद्द असण्यामुळे प्रवाशांना पर्यायी योजना करणे गरजेचे आहे. तसेच, तिकीट खरेदी करण्यापूर्वी गाडीची उपलब्धता तपासणे, पर्यायी मार्ग किंवा पर्यायी गाड्या वापरण्याचा विचार करणे, तसेच प्रवासाच्या वेळेत बदल करणे याची खबरदारी घ्यावी.रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना विनंती केली आहे की, या रद्दीकरणाबाबत संबंधित स्टेशनवरील माहिती काउंटर किंवा अधिकृत वेबसाइटवरून अद्ययावत माहिती घेणे आवश्यक आहे. तांत्रिक कारणांमुळे काही वेळासाठी गाडी रद्द असली तरी, रेल्वे प्रशासन लवकरच गाडीचे संचालन पुन्हा सुरू करेल. प्रवाशांनी या रद्दीकरणामुळे अडचण होऊ नये यासाठी पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे आहे. प्रवाशांनी आपला प्रवास सुरक्षित आणि सुकर व्हावा यासाठी ही सूचना लक्षात ठेवावी.



# डॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता !

विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दीन. महापरिनिर्वाणदिनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे.

डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.

इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी आम्ही शासनकर्ती जमात बनणार या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती.गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते.पत्रकार महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन!!

# रागावर माफीचं औषध? काय प्रकार आहे?

माफ करणं हा सर्वात मोठा अलंकार आहे. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. आज भारताचे सर्वोच्च न्यायाधीश गवई साहेब, न्यायाधीश पदावरुन निवृत्त झाले. ज्यातून न्यायाधीश महोदयांचा सन्मान दिसून येतोय.प्रकरण आहे, न्यायाधीश महोदयांचंच. या प्रकरणात न्यायाधीश महोदयांना एका व्यक्तीनं चप्पल भिरकावल्याचं उदाहरण होतं. परंतु त्यांनी त्या गृहस्थाला सढळ मनानं माफ केलं. कारण माफी हा त्यांना सर्वात मोठा अलंकार वाटला आणि तोच अलंकार दिग्गज व्यक्तीमहोदयांचा असतो.

आज आपण पाहतो की आज वर्तमानपत्रातून वाईट वाईट घटना लिहून येत आहेत. कोणी कोणाचा अपमान करीत असल्यानं बदल्याच्या भावनेनं अपमान करणाऱ्यांची हत्या करीत आहेत. तसं पाहिल्यास माफ करायला कोणी तयार नाहीत. ज्यातून गुन्हे घडत आहेत व ते गुन्हे थांबविण्याला कोणताच पर्याय निघत नाही असंच झालंय. देशातील गुन्हेगारीचे प्रमाण वाढतच चाललेले असून दररोज कितीतरी खटले याच कारणानं न्यायालयात जातात व तारीखवर तारीख चालत असतात. अगदी माणसं थकून जाईपर्यंत. त्यांना न्याय मिळत नाही.

गवई साहेबांनाही वाटत नसेल का ज्यावेळेस संबंधीत इसमानं चप्पल भिरकावल्याचं प्रकरण केलं गवई साहेबांसोबत. वाटल्यास ते सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश पदावर असल्यानं ते त्या इसमाविरोधात काहीही करु शकले असते. परंतु त्यांनी तसं केलं नाही. कारण बौद्ध धम्म अशा गोष्टीची वा बदल्याच्या भावनेची पुष्टी करीत नाही वा सहमती देत नाही. बौद्ध धम्म हा प्रज्ञा, शील व करुणेनं भरलेला असून तो धम्म हा कधीच कोणाचा राग करा नका. हे सांगतोय. त्यातच कोणी आपला अपमान करीत असला तरी त्यांना माफ करा असं सांगतोय. तेच तत्व सर्वच धर्म आपल्या धर्मग्रंथातून सांगतात. अन् ते आपल्याला माहीतही आहे. परंतु लक्षात कोण घेतोय. त्यातच आपल्याला त्याचं काय करायचं आहे, याचा विचार प्रत्येकजण करतात आणि तुर्तास तो विचार त्यागून गुन्हे करीत असतात. अर्थात अपमान करत सुटतात.

बौद्ध धम्म..... बौद्ध धर्माबाबत सांगायचं झाल्यास आधी तथागतांबद्दल. सांगावं लागेल. त्यांनी त्यांच्याशी उदंड स्वरुपात वागणाऱ्या अंगुलीमालाला माफ केलं व त्यांना बोध दिला. ज्यातून अंगुलीमाल तथागत भगवान गौतम बुद्धाचे शिष्य बनले. दुसरं प्रकरण आहे एका स्त्रीचं. ती स्त्री तथागत भगवान गौतम बुद्धावर आळ लावून म्हणत होती की ते व्याभिचारी आहेत. तिच्या पोटातील बाळ हे त्यांचच आहे. त्यावर तथागतांनी अतिशय सौम्य शब्दात तिची कानउघाडणी केली व तिला माफ केलं. त्यानंतर त्यांच्या शिष्याची परिक्षा पाहणाऱ्या व त्यांच्या शिष्याशी उदंड वागणाऱ्या आम्रपालीलाही त्यांनी माफ केलं व तिला आपली शिष्या बनवलं. एवढंच नाही तर त्यावेळेचा समाज तथागतांनी अछूतांना स्पर्श करु नये, म्हणून त्यांच्या रस्त्यावर काटे टाकत. तथागत त्यावरही क्रोध न दाखवता त्या काट्यावरुन चालत व अस्पृश्यांना स्पर्श करुन आपला शिष्य बनवत. त्यानंतर ते जे माफीचं शस्त्र वापरत. ते शस्त्र संबंधीत विरोध करणाऱ्या लोकांना त्यांच्या पायावर लोळण घेणारे ठरत असे.

अशाच माफीच्या शस्त्रानं तथागतांचा शिष्य परीवार वाढत गेला व सम्राट अशोकही तेच तत्व पाहून बौद्ध झाले.

आजही त्याच परिस्थितीचा विचार केल्या जातो. विचार केल्या जातो आणि एखाद्यावेळेस एखाद्या गुन्ह्याचा शोध लावायचा असल्यास माफीचा साक्षीदार बनवलं जातं. या घटनेत जो व्यक्ती माफीचा साक्षीदार बनतो. तो व्यक्ती गुन्हा करणाऱ्या व्यक्तींची माहिती पटापट सांगतो व गुन्ह्यातील आरोपी सापडतात. परंतु सर्वच गुन्ह्यात गुन्हेगारांना माफ करता येत नाही. त्याचं कारण आहे, तशा प्रकारचे गुन्हे ढविष्यात न घडणं. गुन्ह्याबाबत विचार केल्यास प्रत्येक गुन्हेगारांना माफ करीत गेलं तर..... गुन्हेगारांना अभय मिळेल व गुन्ह्यात घट नाही तर वाढच होईल. गुन्हे घडतच जातील यात शंका नाही.माफ करणं हा एक मोठा अलंकार हे आधीच सांगीतलंय. माफीच्या याच शस्त्रानं महात्मा गांधींनी लोकांना एकत्र केलं होतं व स्वातंत्र्याविषयी त्यांच्यात ज्योत पेटवली होती. एवढंच नाही तर लोकं याच शस्त्राचा आधार घेत मरणासाठी समोर जात. परंतु त्यांचे आप्त त्यांना फाशी दिली म्हणून इंग्रज सरकारचा राग पकडत नसत. वाटत असे की मारुन मारुन असे किती मारेल इंग्रज सरकार. एक ना एक दिवस त्यांना वाटेल की असं मारुन काही उपयोग नाही. आपल्याला यांना स्वातंत्र्य द्यावंच लागेल. शेवटी याच शस्त्राचा वापर करुन तमाम भारतीयांनी त्यांना जेरीस आणलं व स्वातंत्र्य मिळालं. जर आपण विचार केला असता की इंग्रजांच्या प्रतिकाराचं उत्तर आपण शस्त्रानं देवू वा युध्द करु त्यांच्यासोबत, तर आपण टिकू शकलो नसतो. कारण त्यांच्याजवळ अत्याधुनीक स्वरुपाचे शस्त्र होते. ज्यांचा प्रतिकार आपण करु शकलोच नसतो. शिवाय आज जो आपला देश दिसतो ना. आपल्या हक्काचा. तो देश आपल्याला दिसला नसता. आज आपण इंग्रजच असतो. भारतीय नाही.

महत्वपुर्ण बाब ही की माफ करणं ही फार मोठा गुण आहे व तो आपल्यात असावा. माफ केल्यानं माणूस काही लहान होत नाही. तो मोठाच होतो. परंतु ते जो समजेल, त्यालाच कळतं. इतरांना नाही. तेव्हा माणसानं माफ करणं शिकावं. कारण माफीनं कोणत्याही प्रकरणांची अतीतीव्रता कमी होवून जात असते. ज्याप्रमाणे एखादं अँटीबायोटीक औषधी एखाद्या रोगावर रोगप्रतिकार शक्ती म्हणून काम करते. अगदी त्याचप्रमाणे माफी ही रागा सारख्या रोगावर अँटीबायोटीक औषध म्हणून काम करीत असते. म्हणूनच लोकांनी रागावर औषध म्हणून माफीचा काढा प्यावा. जेणेकरुन कोणत्याचा प्रकेरचा रागाचा आजार होणार नाही. ज्यातून गुन्हेगार नावाचे जंतू वाढीस लागतील व समाजात अंधाधुंद पसरेल. समाजात शांतता टिकावी. असं जर प्रत्येकाला वाटत असेल तर त्यांनी रागावर माफीचं औषध वापरावं म्हणजे झालं.

**-अंकुश शिंगाडे, नागपूर**

# मुक्त विद्यापीठात एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाची उद्बोधन कार्यशाळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)**



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाची उद्बोधन कार्यशाळा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालक डॉ. संजीवनी महाले यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित चार दिवसांची सदर कार्यशाळा दोन टप्प्यात ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने झाली. त्यात राज्यभरातील विविध अभ्यासकेंद्रातील केंद्रप्रमुख, केंद्र समन्वयक संमंत्रक व संशोधन मार्गदर्शक असे एकूण ६९ जण सहभागी झाले.

कार्यशाळेत विद्यापीठाचे प्र. कुलगुरु प्रा. जोगेंद्रसिंग बिसेन यांनी 'विकसित भारत २०४७ मध्ये विद्यापीठांची भूमिका' या विषयी प्रमुख मार्गदर्शन केले. विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालक डॉ. संजीवनी महाले यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीम. स्नेहल मांजरेकर यांनी या कार्यशाळेचे समन्वयन केले.

तसेच एम.ए. शिक्षणशास्त्र संरचना आणि मूल्यमापन (प्रा. संजीवनी महाले), संशोधन कार्यासाठी विविध संस्यांकडून मिळणारे अनुदान (प्रा. व्ही. बी. गायकवाड), संशोधन कार्याच्या विविध स्रोतांचे उपयोजन (डॉ. प्रकाश बर्वे), संशोधन कार्य कृती सत्र ३ व सत्र ४ (श्रीम. स्नेहल मांजरेकर), संशोधन लेख / शोधनिबंध विकसन आणि -ख चा वापर (डॉ. राजकुमार ननवरे), अध्यापनाविषयक क्षेत्रीय कार्य आणि आंतरवासिता कार्यवाही (डॉ. सुभाष सोनुने), संमंत्रक संकल्पना व संमंत्रक प्रतिमाने परिचय (डॉ. दयाराम पवार), संपर्कसत्र कार्यवाही (श्रीमती वर्षा बहिरम), प्राश्निक परीक्षक समीक्षक कार्य (प्रा. सज्जन थूल), परीक्षा पद्धत (डॉ. चंद्रकांत पवार) याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. प्रश्नोत्तरे व खुली चर्चा करण्यात येवून उपस्थितांचे शंका निरसन करण्यात आले.

# केज उपजिल्हा रुग्णालयातील शौचालयांचे आउटलेट ब्लॉक; रुग्णांचा संताप

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज (प्रतिनिधी)** केज उपजिल्हा रुग्णालयातील शौचालयांचे आउटलेट अर्धवट ब्लॉक झाल्यामुळे रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचाऱ्यांना प्रचंड गैरसोय भासत आहे. रुग्णालयातील पुरुष आणि महिला शौचालयातून सांडपाणी परत येत असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे.रुग्णांना औषध उपचार घेण्यासाठी ऍडमिट केले असताना शौचालये वापरण्यायोग्य नसल्यामुळे पर्यायी व्यवस्था शोधावी लागते. प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेक वेळा दुरुस्तीची मागणी केली, तरी अद्याप कोणतेही काम सुरू झालेलं नाही.




रुग्णालयात रोज शेकडो रुग्ण येतात आणि अशा प्रकारच्या स्वच्छतेच्या समस्येमुळे गैरसोय गंभीर ठरत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की औषधांचा तुटवडा असलेल्या परिस्थितीत ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना उपचार घेण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन रुग्णांची गैरसोय थांबवावी, अशी मागणी केली जात आहे.

रुग्णाचा अनुभव:माझ्या वडिलांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात ऍडमिट केले होते. शेजारी शौचालयातून घाण वासामुळे वडिलांना खूप त्रास सहन करावा लागला. आम्ही रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येतो, आजारी पडण्यासाठी नाही.

# मुक्त विद्यापीठ-युवाशक्ती फाऊंडेशनतर्फे राज्यभर आठ रोजगार मेळावे

**पहिला मेळावा १२ डिसेंबरला नाशिकमध्ये; २० कंपन्यांकडून २१५० पदांची संधी**

**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यशोदा) आणि युवाशक्ती फाऊंडेशन, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील आठ विभागीय केंद्रांत १८ ते ३५ वयोगटातील तरुण-तरुणींसाठी आठ रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या मालिकेतील पहिला रोजगार मेळावा १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत विद्यापीठ मुख्यालयाजवळील कृषी विज्ञान केंद्र, नाशिक येथे होणार आहे.



मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनाखाली आयोजित होत असलेल्या या मेळाव्यात महाराष्ट्रातील २० हून अधिक नामांकित तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांकडून एकूण २१५० रिक्त पदे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचे शिल्पकार- डॉ. राजेंद्र बगाटे

भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेले आहेत की त्यांचे कार्य, विचार आणि जाणीवा एका कालखंडापुरत्या मर्यादित राहत नाहीत; त्या पिढ्यानपिढ्या समाजाला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला नव्या उंचीवर नेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच कालजयी व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका नेत्याची आठवण नव्हे, तर न्याय, समता, स्वाभिमान आणि संघर्षाच्या मूल्यांना पुनश्च जागृत करणे होय. भारतातील दलित, वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य हे मानवाधिकार, सामाजिक लोकशाही आणि समतामूलक राष्ट्रनिर्मितीचे ध्वजवाहक होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी सुरुवातीला ज्या सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवात त्यांनी जीवनाची सुरुवात केली ते समजणे आवश्यक आहे. अस्पृश्यता ही जणू सामाजिक संस्थाच बनली होती. जन्म म्हणजे कर्म, आणि कर्म म्हणजे जात ही विचारधारा भारतीय समाजावर ठसवण्यात आली होती. परंतु या रूढीवाद, अवैज्ञानिकता आणि सामाजिक विषमतेचे निःशब्द बळी होण्याऐवजी त्यांनी त्याविरोधात बौद्धिक क्रांती उभारली. समाजाने दिलेली ओळख स्वीकारण्याऐवजी त्यांनी स्वतःची ओळख ज्ञान, संघर्ष आणि नेतृत्वातून घडवली. ते म्हणत असत की माझे आयुष्य हे जन्माचे फळ नाही, तर माझ्या संघर्षाचे यश आहे.

त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे माध्यम बनवले. शिक्षण मिळवणे हे जणू त्यांच्या जीवनातील सामाजिक अन्यायाविरुद्धचे पहिले युद्धच होते. समाजाने 'अस्पृश्य', 'अयोग्य' म्हणत जे दरवाजे बंद केले, ते त्यांनी मेहनतीने, बुद्धिमत्तेने आणि चिकाटीने उघडले. कोलंबिया विद्यापीठातून पीएच.डी., लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधील बॅरिस्टर, कायद्याची पदवी यामुळे ते फक्त भारतासाठीच नव्हे तर जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत ठरले. त्यांचे अध्ययन केवळ पुस्तकापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक वास्तवाचे अभ्यासक होते. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राजकीय तत्त्वज्ञान, स्त्री-अधिकार, धर्म, इतिहास, मानवाधिकार आणि सामाजिक मानसशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत अभ्यास केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या व्यक्तीगत संघर्षातून उभा राहिला. जिथे एक 'जात' मनुष्याच्या अस्तित्वाचे मूल्य ठरवत होती, तिथे त्यांनी मानवतेचा, बंधुत्वाचा आणि समतेचा नवा सामाजिक अर्थ प्रस्तावित केला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा फक्त पाण्याचा प्रश्न नव्हता तर तो मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत हक्कांचा प्रश्न होता. त्या आंदोलनात हम पानी लेंगे, हक्क से लेंगे! असे त्यांनी सांगत भेदभावग्रस्त समाजाला पहिल्यांदा स्वाभिमानाची ताकद दिली.नंतर नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहामध्ये त्यांनी धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. मनुष्य देवाच्या निर्मितीचा असतो, परंतु जातव्यवस्था मनुष्यांच्या बनावट नियमांची ही घोषणा ज्या समाजात अस्पृश्यांना देवासमोर उभे राहण्याचा अधिकार नव्हता, त्या समाजात क्रांतिकारी होती. या आंदोलनांनी अस्पृश्यतेच्या भिंती फक्त हादरवल्या नाहीत, तर कोसळायला सुरुवात केली.

त्यांच्या सामाजिक कार्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे महिलांसाठी दिलेले अधिकार. स्त्रियांच्या शिक्षणाचे, समतेचे आणि स्वातंत्र्याचे त्यांनी सर्वाधिक जोरदार समर्थन केले. हिंदू कोड बिलच्या माध्यमातून स्त्रियांना संपत्ती, विवाह, घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या अधिकारांची हमी देण्याचा त्यांचा प्रयत्न हा स्त्री-मुक्तीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. तथापि, या सुधारणा मंजूर करण्यास विरोध झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देताना स्पष्टपणे सांगितले की जे समाज स्त्रीला समानता देत नाहीत, त्यांची प्रगती कधीही होऊ शकत नाही.भारतीय संविधानाच्या रूपात त्यांनी देशाला नव्या सामाजिक व्यवस्थेचा आराखडा दिला. हे संविधान फक्त कायद्यांचा संच नाही तर ते भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचे, सन्मानाचे आणि मानवाधिकारांचे संरक्षण करणारे जिवंत दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की राजकीय लोकशाही पुरेशी नाही; ती सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर आधारित असली पाहिजे. यामध्येच भारतीय समाजक्रांतीचे मूलतत्त्व दडलेले होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. भारतातील शेतकरी, कामगार यांचे प्रश्न त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडले. जमीन सुधारणा, राष्ट्रीय जलनीती, औद्योगिकीकरण, बँकिंग क्षेत्र, वित्तीय व्यवस्थापन आणि कामगार कायदे या सर्व क्षेत्रांत त्यांनी मार्गदर्शक धोरणे मांडली. रिजर्व्ह बँकेच्या स्थापनेमागील त्यांची आर्थिक संकल्पना ही त्यांच्या अभ्यासाची खोली दर्शवणारी होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त समाजसुधारणेपुरते मर्यादित नव्हते तर ते मानवमुक्तीचे अभियान होते. त्यांनी धर्माच्या नावावर चालणाऱ्या अन्यायाला आव्हान दिले आणि अखेर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्विकारला. हा निर्णय संतापाचा नव्हता, तर आत्मसन्मानाचा आणि विवेकाधिष्ठित धर्माचा स्वीकार होता. ते म्हणाले होते की मी हिंदू म्हणून जन्मलो, हे माझ्या हातात नव्हते; पण मी हिंदू म्हणून मरणार नाही, हे मी ठरवले. आणि या निर्णयातून त्यांनी भारतीय इतिहासाला नव्याने 'बौद्धयुग' दिले. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांकडे पाहतो तेव्हा एक प्रश्न उभा राहतो की त्यांचे स्वप्न कितपत पूर्ण झाले? संविधानाचा आदर करणे, समानता स्वीकारणे, जातभेद नष्ट करणे, मानवतेच्या मूल्यांचे पालन करणे ही मूल्ये आज अजूनही संघर्षात आहेत. जातीय हिंसा, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, महिलांवरील अत्याचार, धार्मिक ध्रुवीकरण आणि शिक्षणातला वर्गविचार आजही अस्तित्वात आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ संपलेली नाही तर ती अजूनही चालूच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मंत्र शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र केवळ घोषवाक्य नसून सामाजिक परिवर्तनाचे क्रियासूत्र आहे.

शिक्षण हे व्यक्तीला विचार देतं; संघटना व्यक्तीला शक्ती देते; आणि संघर्ष व्यक्तीला इतिहास बदलण्याची ताकद देतो. हा संघर्ष द्वेषाचा नाही; तर न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठी आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महत्ता फक्त भारतीय समाजापुरती मर्यादित नाही तर जगातील सामाजिक न्यायाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मानवसंस्कृतीच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते. ते फक्त संविधानकार नाहीत; ते मानवतेचे अभियंते आहेत. ते फक्त नेता नाहीत; ते विचारयुगाचे निर्माता आहेत. ते फक्त इतिहासाचा भाग नाहीत; तर ते भविष्याचा मार्ग आहेत.आज ६ डिसेंबर रोजी असणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मृतीदिन हा केवळ अभिवादनाचा क्षण नसून जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या कार्याचे, तत्त्वज्ञानाचे, सामाजिक उभारणीच्या दृष्टिकोनाचे अनुसरण करणे हीच खरी कृतज्ञता आहे. त्यांचा विचार जिवंत राहिला, न्यायव्यवस्था समतामूलक राहिली, समाजाने मनुष्याला मनुष्य म्हणून स्वीकारले तरच त्यांचे स्वप्न पूर्ण होईल. आपण सर्वांनी एकत्र येऊन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला नव्हे, तर त्यांच्या विचारांना वंदन करणे ही काळाची गरज आहे.

अशा या ज्ञानाच्या प्रतीकला विनम्र अभिवादन.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# संक्षिप्त

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२६ मधील परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन २०२६ मधील नियोजित विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या http://mpsc.gov.in व http://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव र. प्र. ओतारी यांनी कळविली आहे.प्रस्तावित वेळापत्रकानुसार सन २०२६ मध्ये राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२५, महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा-२०२५, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२५, महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा-२०२५, महाराष्ट्र गट- ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा-२०२५, महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा-२०२५, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित परीक्षा-२०२६, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा-२०२६ व महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा-२०२६ इत्यादी परीक्षा होणार आहेत, असेही कळविण्यात आले आहे.

## नौदलातील शहिदांना आदरांजली तर कार्यरत सैनिकांना सन्मान - रोहिणी खांदवे यांचे प्रतिपादन



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/**सिल्लोड येथील ज्ञान विकास विद्यालयात नौदल दिनानिमित्त विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. तिन्ही दलांपैकी एक असलेल्या भारतीय नौदलातील शहिदांचे स्मरण, त्यांना अभिवादन आणि सध्या सेवेत असलेल्या सैनिकांचा गौरव करणे म्हणजे खरी नौदल दिनाची सांगता असल्याचे प्रतिपादन विद्यार्थीनी रोहिणी खांदवे यांनी केले.अशोकदादा गरुड शैक्षणिक समूह संचलित ज्ञानविकास विद्यालय, भराडी येथे आयोजित कार्यक्रमात यश अक्कर, भक्ती जाधव, रोहिणी खांदवे आदी विद्यार्थ्यांनी नौदल दिनाचे महत्त्व स्पष्ट करत मनोगते व्यक्त केली.नौदलातील जवानांनी राष्ट्रसेवेसाठी दिलेल्या त्यागाचे स्मरण करत विद्यार्थ्यांनी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

## सनव गावात शेतकरी कृती समितीची बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** सनव तालुका गंगापूर येथे शेतकरी कृती समितीची बैठक पार पडली. बैठकीत अतिवृष्टी २०२५ अनुदान, रब्बी बियाण्यांचे अनुदान तसेच अतिवृष्टी २०२४ अनुदान याबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीत धक्कादायक बाब समोर आली की अतिवृष्टी २०२४ साठी केवायसी यादी मिळाली नव्हती. शेतकरी कृती समितीचे इंजिनिअर महेशभाई गुजर यांनी तलाठी जाधव यांच्याशी संपर्क साधला असता, यादी तहसील कार्यालयात जमा असल्याचे कळाले. तत्पूर्वी, तहसील कर्मचारी भाले यांनी संकेतस्थळावर तपासणी करून यादी डाउनलोड करून शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिली.बैठकीत इंजिनिअर महेशभाई गुजर यांचा शेतकरी हितासाठी केलेल्या कार्याबद्दल जेष्ठ शेतकऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सनव गावातील जेष्ठ शेतकरी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुलताबाद शहरात अफवांचे पेव



**-पोलीस मोठ्या बॅगांमध्ये ईव्हीएम मशीन घेऊन जात असल्याची अफवा पसरल्याने खळबळ**
**-मतमोजणी पुढे गेल्याने उमेदवारांची धाकधूक वाढली; खुलताबाद शहरांमध्ये राजकीय हवामान ढवळून निघाले**
**-मतमोजणीची तारीख लांबणीवर**
**-पडली: नेत्यांसह उमेदवारांची वाढली धाकधूक, चौका-चौकात रंगत आहेत- विजय प्रजयाच्या गप्पांच्या मैफिली.**

आत्ताच एक्सप्रेस

खुलताबाद /प्रतिनिधी / खुलताबाद शहरात नगरपरिषद निवडणुकीच्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर अफवांचा प्रचंड गदारोळ उडाला. गुरुवारी रात्री उशिरा शहरभर ही अफवा पसरली की पोलिस मोठ्या बॅगांमध्ये ईव्हीएम मशीन वाहून नेत आहेत. या अफवेमुळे शहरातील राजकीय वातावरण तणावग्रस्त झाले, उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांमध्ये धाकधूक निर्माण झाली आणि नागरिकांमध्येही चिंता पसरली.खुलताबाद नगरपरिषदेच्या निवडणुकीत एकूण २० नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष पदासाठी मतदान झाले होते. मतमोजणीसाठी वापरण्यात आलेल्या सर्व ईव्हीएम मशीन नगरपरिषद कार्यालयाच्या वरील हॉलमध्ये स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आल्या होत्या. या स्ट्राँग रूमला तीन स्तरीय सुरक्षा प्रदान करण्यात आली असून, शस्त्रधारी पोलीस व सीआरपीएफचे जवान तैनात होते.

घटना अशी आहे की, स्ट्राँग रूममध्ये तैनात काही सीआरपीएफ जवानांना अमरावतीला जाण्याचे आदेश आले होते. त्यानुसार त्यांनी आपले वैयक्तिक सामान बॅगांमध्ये भरून वाहतुकीसाठी तयार केले. पण, शहरात अफवा पसरली की हे बॅग ईव्हीएम मशीनसह भरून नेत आहेत. त्यामुळे अनेक उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी रात्रीच नगरपरिषद कार्यालय आणि पोलीस ठाण्याकडे धाव घेतली.उमेदवारांनी आणि कार्यकर्त्यांनी पोलीस व्हॅनमध्ये बॅग टाकताना पाहिल्यानंतर थेट जवानांना थांबवून बॅग तपासण्याची मागणी केली. सुरुवातीला जवानांनी बॅगेत फक्त वैयक्तिक कपडे आणि साहित्य असल्याचे सांगून दाखवण्यास नकार दिला. यामुळे लोकांमध्ये ईव्हीएम हलवण्याचा संशय अधिकच वाढला. संतप्त उमेदवार आणि कार्यकर्त्यांनी स्थानिक पोलिसांना प्रकरणाची माहिती दिली आणि सुमारे काही वेळाने सर्व जमाव पोलीस ठाण्यावर पोहोचला. पोलिसांनी तातडीने राखीव दलाच्या जवानांना बॅग उघडण्यास सांगितले, त्यात फक्त कपडे व वैयक्तिक सामान असल्याचे उघड झाले.

या संपूर्ण घटनाक्रमामुळे शहरातील मतदार, उमेदवार आणि पोलीस यंत्रणेवर मानसिक ताण वाढला. मतमोजणी लांबणीवर गेल्याने उमेदवारांची चिंता अधिकच वाढली होती. यावेळी शहरातील चौक-चौकात उमेदवार आणि त्यांचे समर्थक रंगतत राहीले, विजय प्रजयांच्या गप्पांच्या मैफिलीत तणाव थोडासा हलका होत होता, पण ईव्हीएम सुरक्षित आहे की नाही याबाबत चिंता कायम होती. स्ट्राँग रूमसाठी कडेकोड बंदोबस्त लावला गेला होता, जेणेकरून कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होऊ नये.एकूणच, खुलताबाद शहरात अफवांमुळे उडलेल्या खळबळीत मतदार, पोलीस आणि राजकीय पक्षांच्या सर्व स्तरांवर अस्वस्थता दिसून आली. यामुळे नागरिक आणि उमेदवारांना मतदान प्रक्रियेवरील पारदर्शकता आणि सुरक्षा याबाबत जागरूकता अधिक वाढली, तसेच भविष्यात अशा अफवा पसरवल्यास त्यांचा परिणाम किती गंभीर ठरू शकतो हे लक्षात आले.

# प्रतिक्षा पगारे यांचा जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात पहिले स्थान

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/प्रतिनिधी/** कै. बाबुरावजी काळे माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थीनी प्रतिक्षा पगारे यांनी तालुका स्तरावर आयोजित ५३ वे विज्ञान प्रदर्शन मध्ये १७१ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. राज्य विज्ञान संस्था, प्रादेशिक विद्या प्राधिकरण नागपूर अंतर्गत गुरुवारी पार पडलेल्या या प्रदर्शनात विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण प्रोजेक्ट सादरीकरणांनी सर्वांची मनं जिंकली.

**तालुका स्तरावरील निकाल:**
**प्रथम:** प्रतिक्षा पगारे (कै. बाबुरावजी काळे माध्यमिक विद्यालय, सोयगाव)
**द्वितीय:** भाग्यश्री लक्ष्मण निकम (एस. बी. हायस्कूल, गोंदेगाव)
**तृतीय:** ज्योत्सना वाल्मिक पाटील (जि.प. प्रशाला, सोयगाव)

प्रतिक्षाच्या यशस्वी सादरीकरणाबद्दल शुक्रवार (दि.५) रोजी विद्यालयात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत जंगी स्वागत करण्यात आले. या प्रसंगी मु. अ. निलेश पाटील, शिक्षक योगेश काळे, सागर घाटे, ज्ञानेश्वर एलिस, शिक्षिका अजली कथलकर, रूपाली मानकर यांच्यासह इतर शिक्षक उपस्थित होते.

प्रदर्शनात शाश्वत शेती, कचरा व्यवस्थापन, हरित ऊर्जा, उदयोन्मुख तंत्रज्ञान, गणितीय मॉडलींग, आरोग्य व स्वच्छता, जल संवर्धन अशा विविध विषयांवर सोयगाव तालुक्यातील



प्राथमिक (सहाववी ते आठवी) आणि माध्यमिक (नववी ते बारावी) शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले. गटसाधन केंद्राचे तज्ञ शिक्षक सुनील बावचे, कैलास लांडगे, जगन्नाथ काकडे, प्रतिज्ञा सोनवणे, डॉ. एस. एल. पाटील, आर. टी. जाधव, शेख टी. आर. यांनी विद्यार्थी प्रकल्पांचे काटेकोर मूल्यांकन करून योग्य दिशादर्शन केले.माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक मिळविला प्राची सोनवणे, शुभ्रा सोहनी, जयश्री कोळी यांना शाश्वत शेती प्रकल्पासाठी गौरव करण्यात आला.विद्यार्थ्यांचे शिक्षक, गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे, केंद्र प्रमुख फिरोज तडवी, पालक व गावकरी यांनी अभिनंदन केले.

## विभागीय लोकशाही दिनाचे ८ डिसेंबर रोजी आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी ८ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत.

अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही. जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# रब्बी हंगाम २०२५-२६ प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**-१ ते ७ डिसेंबर - १० वा पीक विमा सप्ताह**
**-गहू, हरभरा व रब्बी कांदा पिकांसाठी १५ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** रब्बी हंगाम २०२५-२६ साठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेची नोंदणी सुरु झाली आहे. शेतकऱ्यांमध्ये पीक विम्याबाबत जागरूकता वाढावी आणि सहभाग वाढावा यासाठी १ ते ७ डिसेंबर दरम्यान १० वा पीक विमा सप्ताह राबविण्यात येत आहे. यानंतरही संपूर्ण डिसेंबर महिनाभर नोंदणी मोहीम सुरू राहणार आहे.

शेतकऱ्यांनी या योजनेत अधिकाधिक सहभाग नोंदवावा असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे.शेतकऱ्यांना रब्बी हंगाम २०२५-२६ मधील पीक विमा योजनेत गहू (बागायत), हरभरा, रब्बी कांदा या तीन अधिसूचित पिकांसाठी १५ डिसेंबर, २०२५ पर्यंत सहभागी होता येणार आहे. पीक विमा योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होणे ऐच्छिक आहे. या योजनेत नोंदणीसाठी https://pmfby.gov.in हे राष्ट्रीय पीक विमा पोर्टल कार्यान्वित करण्यात आले.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून छत्रपती संभाजीनगर कृषी विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना या जिल्ह्यांत भारतीय कृषी विमा कं. लि. व बीड जिल्ह्यात आय.सी.आय.सी.आय. लोंबार्ड इं. कं. लि. या कंपनीमार्फत या ही योजना राबविण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी गहू (बागायत) ४५००० रु. (३३७.५० रु.), हरभरा- ३६००० रु. (२७०रु.), रब्बी कांदा- ९०००० रु. (६७५रू.), जालना जिल्ह्यासाठी गहू (बागायत) ४५००० रु. (४५० रु.), हरभरा- ३६००० रु. (३६०रु.), बीड जिल्ह्यासाठी गहू (बागायत) ४५००० रु. (६७५ रु.), हरभरा- ३६००० रु. (५४०रु.), रब्बी कांदा- ७५००० रु. (११२५रू.) अशी जिल्हा व पीकनिहाय विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टरी विमा हप्ता शेतकऱ्यांनी भरावयाची आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी, फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक खाते तपशील, जमीन धारणा उतारा (८-अ उतारा), भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना नोंदणीकृत भाडेकरार आदी कागदपत्रे आवश्यक असून ई-पीक पाहणी करणे बंधनकारक आहे.

कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत विहित नमुन्यात अर्ज भरुन सहभागी होता येईल. तर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी व्हायचे नसेल तर तसे त्यांनी नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे. जे शेतकरी स्वतःच्या स्वाक्षरीसह योजनेत सहभागी न होणेबाबत घोषणापत्र देणार नाहीत त्या सर्व शेतकऱ्यांचा योजनेमध्ये सहभाग बंधनकारक समजला जाईल.

या योजनेमध्ये केवळ पीक कापणी प्रयोग आधारे,तांत्रिक उत्पादन आधारे उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील. रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागासाठी https://pmlby.gov.in या पोर्टल स्वतः शेतकरी यांनी अथवा बँक, विमा कंपनीने नियुक्त केलेले एजंट, कॉप इन्शुरन्स सेवा केंद्र (CSC) यांच्या मार्फत नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी तात्काळ आपल्या जिल्ह्यातील संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, स्थानिक कृषि कार्यालयाशी तसेच १४४४७ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.

# ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन सोयगाव - विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण सादरीकरणांनी सर्वांचे लक्ष वेधले

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव (प्रतिनिधी)** ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहपूर्वक आणि यशस्वीपणे पार पडले, जिथे विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील सादरीकरणांनी सर्वांची मने जिंकली. पंचायत समिती सोयगाव अंतर्गत जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, सोयगाव यांनी उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि मनोवेधक कार्यक्रम रचनेतून हे विज्ञान प्रदर्शन आयोजित केले. या प्रदर्शनात विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण संवर्धन, ऊर्जा व्यवस्थापन, कृषी तंत्रज्ञान, आरोग्य विज्ञान, रोबोटिक्स, डिजिटल नवकल्पना अशा विविध विषयांवर आधारित दर्जेदार मॉडेल्सचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाची, संशोधन वृत्तीची आणि समस्या सोडवण्याची क्षमता उभरून दिसली.

प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी कार्यालयाचे मा. पाटील साहेब, सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी आणि सावळदबारा केंद्राचे केंद्रप्रमुख जनार्धन साबळे उपस्थित होते. गटसाधन केंद्राचे तज्ज्ञ सुनील बावचे, कैलास लांडगे, जगन्नाथ काकडे व सौ. प्रतिज्ञा सोनवणे यांनी कार्यक्रमाच्या यशासाठी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. तसेच, पर्यवेक्षक टीममध्ये डॉ. एस. एल. पाटील, आर. टी. जाधव, शेख टी. आर. यांनी प्रत्येक विद्यार्थ्याचे काटेकोर मूल्यांकन करून योग्य मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांचा गौरव, उद्घाटन व निरीक्षण प्रसंगी विशेष ठरला, आणि केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक करून विज्ञानाधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटातून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव येथील प्राची सोनवणे, शुभ्रा सोहनी, जयश्री कोळी या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शाश्वत शेती उपकरणाला प्रथम क्रमांक मिळाला, आणि त्यांची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झाली. या यशासाठी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील आणि शिक्षक रामचंद्र महाकाळ यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले, तसेच गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे, केंद्र प्रमुख फिरोज तडवी, पालक आणि गावकरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या भव्य उपक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, सोयगाव तर्फे उत्कृष्टरीत्या करण्यात आले. मुख्याध्यापक किरण पाटील यांनी संपूर्ण नियोजन, व्यवस्थापन, समन्वय आणि कार्यक्रमाचे आयोजन स्वतः पाहून शिस्तबद्धपणे प्रदर्शन पार पाडले. त्यांच्या कार्यतत्परतेचे, नेतृत्वगुणांचे आणि शैक्षणिक दृष्टीकोनाचे सर्वत्र कौतुक झाले.

विद्यार्थ्यांच्या प्रदर्शनातून पर्यावरण संवर्धनाची जाणीव, विज्ञानाधारित विचारसरणी, तंत्रज्ञानातील नवसर्जनाच्या संधी आणि समाजसुधारक दृष्टिकोन यांचा संदेश स्पष्टपणे उमटला. हे प्रदर्शन केवळ विद्यार्थ्यांच्या ज्ञानवर्धनासाठीच नव्हे, तर विज्ञाननिष्ठ समाजनिर्मितीचा संदेश देणारे ठरले. विद्यार्थ्यांनी केलेले उपक्रम, त्यांची कल्पकता, अभ्यासाची गुणवत्ता आणि व्यावहारिक विज्ञानातील रुची यामुळे संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

एकूणच, ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन हा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला, ज्यामुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, नवकल्पनाशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना प्रोत्साहन मिळाले. भविष्यातील विज्ञान शिक्षण आणि संशोधनासाठी या विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्साहाचे आणि कामगिरीचे उदाहरण ठरेल.

## सुरेश खोत यांचे निधन



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर येथील सा.बा. विभागातून निवृत्त ज्येष्ठ नागरिक सुरेश खोत (वय ८३) यांचे अल्पशा आजाराने दिनांक ४ रोजी निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई आणि नातवंडे असा आप्त परिवार आहे. ज्येष्ठ पत्रकार रमेश खोत यांचे ते थोरले बंधू होत.

# लासुर स्टेशनमधील पाणीटंचाईचा प्रश्न मिटणार



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन परिसरातील दीर्घकाळची पाणीटंचाई लवकरच दूर होणार आहे. जलजीवन मिशन अंतर्गत गंगापूर व खुलताबाद तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अंतर्गत पिण्याच्या पाइपलाइन तसेच जलकुंभ बांधकामाची कामे सुरू असून, पुढील एका वर्षात मतदारसंघातील कोणतेही गाव पिण्याच्या पाण्याविना राहणार नाही, असा विश्वास आमदार प्रशांत बंब यांनी व्यक्त केला.दि. ५ डिसेंबर रोजी लासुर स्टेशन येथे जलजीवन मिशन योजनेंतर्गत दोन नव्या जलकुंभांच्या कामांचे भूमिपूजन आ. बंब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जलजीवन मिशनचे उपअभियंता बी. बी. सदावर्ते, शाखा अभियंता समीर यन्नावार, डी. एस. कासले, कृऊबा समितीचे सभापती शेषराव जाधव, सरपंच मीना संजय पांडव, प्रतिष्ठित व्यापारी सुरेश मुनोत आदी मान्यवर उपस्थित होते.लासुर स्टेशन ग्रामपंचायत हद्दीत पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी सावंगी आनंतपूर व सावंगी हर्सूल गावांसाठी अनुक्रमे ३ लाख ५५ हजार लिटर व २ लाख ६९ हजार लिटर क्षमतेच्या दोन स्वतंत्र पाणी टाक्यांची उभारणी सुरू असल्याचे आ. बंब यांनी सांगितले. याच ठिकाणी १ लाख ५० हजार लिटर क्षमतेच्या मुख्य वितरण जलकुंडाचे कामही सुरू आहे.या कार्यक्रमाला महेंद्र पांडे, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश कोकरे, नारायण वाकळे, कल्याण पवार, अशोक सौदागर, राजू गायकवाड, रंजना बोरकर, सपना बनकर, संदीप आमराव, राजू पठाण, संजय पांडव, रिपाईचे तान्हाजी बनसोडे, छोटू पठाण यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संक्षिप्त

## शिक्षक संघटनेतर्फे शिक्षक पतसंस्थेतून मोर्चा; प्रलंबित प्रश्नांसाठी ५ मार्चला शाळा बंद आंदोलन



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना समाज समिती, जिल्हा जालना यांच्या वतीने आज शिक्षक पतसंस्थेतून भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. टीईटी शक्ती निर्णय (१५ मार्च २०२४) रद्द करणे, संच मान्यता शासन निर्णय मागे घेणे तसेच इतर विविध प्रलंबित मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला.या प्रश्नांवर तोडगा न निघाल्यास ५ मार्च २०२५ रोजी राज्यभर शाळा बंद आंदोलन आणि महामोर्चा काढण्याचा इशारा संघटनेने दिला.

मोर्चात उत्तमराव वायाळ, दीपक दराडे, संतोष राजगुरू, संजय येळवंते, विजय खडके, भगवान भालके, देवेंद्र बारगजे, मधुकर काकडे, शांतीलाल गोरे, उद्धव पवार, शिवाजी देवडे, लक्ष्मण नेवल, रमेश आंधळे, संजय हेरकर, विनोद अडसूळ, ईश्वर गाडेकर, महादेव वैराळ, अन्सारी नदीम, के. डी. वाघ, श्रीकांत रुपदे, विनोद कळंबे, संजय बनसोडे, संतोष इंगळे, गणेश फुकट, रमेश बदर, तसेच सुचिता वाघमारे, मीनाक्षी पांगारकर, सीमा बदर, संगीता गायकवाड, गबीता सरकटे, नंदा वलकट्टी यांच्यासह जिल्ह्यातील हजारो शिक्षक सहभागी झाले.

## भ्रष्टाचार प्रतिबंध व जागरुकतेवर चर्चासत्राचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/ जिल्हा व्यापारी महासंघ व सेंट्रल ब्युरो ऑफ इन्वेस्टीगेशन (सीबीआय) एसीबी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने समाजात पारदर्शकता जबाबदारी व प्रमाणिकपणाचे मूल्य रुजवण्यासाठी भ्रष्टाचार जागरूकता व प्रतिबंध या विषयावर चर्चासत्राचे आयोजन हॉटेल विजय विलास येथे येथील बँक्वेट हॉलमध्ये सहा डिसेंबर रोजी संध्याकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे अध्यक्ष मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे महासचिव शाम लोया व मार्गदर्शक म्हणून श्री सजीष नायर पोलिस निरीक्षक, सीबीआय, एसीबी, पुणे यांची उपस्थिती राहणार आहे. केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली असलेले सर्व केंद्रीय कार्यालय जसे इन्कम टॅक्स कार्यालय, जीएसटी कार्यालय, पोस्ट ऑफिस, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, सर्व बँका व इतर सर्व कार्यालय यात वाढत असलेल्या भ्रष्टाचार विरोधात तक्रार कुठे करावी व कशी करावी याचे मार्गदर्शन सीबीआयच्या अधिकाऱ्याकडून जनजागृती निमित्त व्यापारी वर्गाला करण्यात येणार आहे. या केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व कार्यालयातील कर्मचाऱ्याबाबत भ्रष्टाचार संबंधी कोणाची व कोणतीही तक्रार असेल तर त्यांनी ९१७५०२२२५० ह्या हेल्पलाइन नंबर वर किंवा ०२०-२७६४२५०१, ९१५८१६५१११ (श्री सजीष नायर, पोलिस निरीक्षक) ह्या नंबर वर संपर्क करावा असे आवाहन सीबीआयच्या अधिकाऱ्याकडून करण्यात आले आहे. तसेच या भ्रष्टाचार विरोधी चर्चासत्राच्या कार्यक्रमास व्यापारी वर्गाने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा अशी विनंती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी व महासचिव संजय दाड यांनी केली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'नो पार्किंग' असूनही मोठ्या प्रमाणात वाहनांची पार्किंग

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्पष्टपणे नो पार्किंगचे फलक लावलेले असूनही त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुचाकी आणि चारचाकी वाहनांची पार्किंग होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

प्रशासनाकडून वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन वारंवार करण्यात येते, मात्र प्रत्यक्षात नागरिकांकडून नियमांकडे दुर्लक्ष केल्याने परिसरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली आहे.

स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात नाराजी व्यक्त करत तातडीने दंडात्मक कारवाई आणि कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'नो पार्किंग'चे फलक स्पष्टपणे लावलेले असतानाही तेथे मोठ्या प्रमाणात वाहनांची पार्किंग होत असल्याचे दिसून येत आहे. हा प्रकार केवळ वाहतूक कोंडी निर्माण करणारा नाही, तर प्रशासनाच्या दृष्टीनेही गंभीर बेफिकिरीचे उदाहरण ठरत आहे.

दररोज मोठ्या संख्येने नागरिक कामानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात ये-जा करतात. कार्यालय परिसर सुरळीत व सुरक्षित राहावा म्हणून 'नो पार्किंग'सारखे नियम लागू केले जातात. परंतु या नियमांची




अंमलबजावणी होत नसल्याने मुख्य प्रवेशद्वाराजवळ रांगेत उभी केली जाणारी दुचाकी व चारचाकी यामुळे मार्ग अरुंद होत आहे. पादचाऱ्यांची हालचाल अडथळली जाते. तातडीच्या सरकारी कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना त्रास होतो.सुरक्षा व्यवस्था बाधित होण्याची शक्यता वाढते.

वाहनचालकांकडून होणारी ही निष्काळजी पार्किंग ही केवळ नियमभंग नाही, तर शासकीय कक्षेत शिस्तभंग करणारी बाब आहे. वाहतूक विभाग व प्रशासनाकडून कठोर कारवाई-जसे की दंड आकारणे, वाहन उचलण्याची (टोईंग) कार्यवाही, तसेच नियमित गस्त-आवश्यक आहे. परिसरात स्पष्ट मार्किंग, बॅरिकेट्स आणि जनजागृती फलक लावणे हेदेखील उपाय म्हणून राबवले जाऊ शकतात.नियमांचे पालन करून शासकीय कार्यालयाजवळील वाहतूक शिस्तबद्ध ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.**छायाचित्र :** किरण खानापुरे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त जालना रेल्वे स्टेशनवर अन्नदान



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईतील चैत्यभूमीवर अभिवादनासाठी जाणाऱ्या अनुयायांसाठी जालना रेल्वे स्थानक परिसरात अन्नदानाचे स्टॉल उभारण्यात आले. दशरथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने गेल्या २३ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे.रेल्वे स्थानकावर पुरी-भाजी, पुलाव तसेच पिण्याचे पाणी संस्थेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आले. ग्रामीण व दूरवरच्या भागातून मोठ्या संख्येने अनुयायी चैत्यभूमीचे दर्शन घेण्यासाठी जात असतात. प्रवासादरम्यान त्यांच्या भोजनाची गैरसोय होऊ नये, कुणीही उपाशी राहू नये या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष त्र्यंबकेश्वर (बंडू) सुरडकर यांनी दोन दशकांपूर्वी हा अन्नदान उपक्रम सुरू केला असून तो यावर्षीही कायम ठेवण्यात आला.

उपक्रमाचा प्रारंभ रेल्वे सुरक्षा दलाचे पोलीस निरीक्षक पवन इंगळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष त्र्यंबकेश्वर सुरडकर, सचिव श्रीमती पद्माबाई सुरडकर, विकास लहाने, हरिष रत्नपारखे, अच्युत मोरे, शेख इब्राहीम, बाळकृष्ण कोताकोंडा, संघदीप कुलतरखे, भारत काळे, गौतम वाघमारे, ॲड. योगेश गाडगे, प्रेमानंद मगरे, आनंद म्हस्के, कांताबाई आढाव, हौसाबाई गंगातीवरे, अंजली खिल्लारे, सीमा सुरडकर, ललिताकौर टाक यांसह अनेक स्वयंसेवक उपस्थित होते.

## आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम -सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणा



अधिक लोकाभिमुख, अधिक सक्षम, तंत्रशुद्ध व सेवाभावी बनवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील वेगवेगळ्या केडरवर काम करणाऱ्या राज्यभरातील सुमारे दोन लाख कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण देणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई येथे सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षणासंबंधी सादरीकरण करण्यात आले. या बैठकीला राज्यातील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रांचे प्राचार्य, आरोग्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रविंद्रन, आरोग्यसेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉक्टर नितीन अंबाडेकर, आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.प्रशिक्षण हा आरोग्य क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. नागरिकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी, चांगली वागणूक देण्यासाठी, कामकाजात गतिमानता, तांत्रिक कौशल्य येण्यासाठी तसेच कार्यक्षमता वाढण्यासाठी प्रशिक्षण हा महत्त्वाचा घटक असल्याने, आरोग्य विभागात विविध पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना तांत्रिक व प्रशासकीय प्रशिक्षण देणार असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

# आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना एकत्रित लागू केल्याने उपचारांची गुणवत्ता सुधारली

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ राज्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या दोन्ही योजना एकत्रित करून जानेवारी २०२५ पासून महत्त्वपूर्ण सुधारणा लागू केल्या आहेत, अशी माहिती राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आण्णासाहेब चव्हाण यांनी दिली.रुग्णांना मिळणाऱ्या उपचारांची संख्या १३५६ वरून २३९९ पर्यंत वाढविण्यात आली असून उपचारांच्या दरात वाढ तसेच पेमेंट प्रक्रियेत आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत.

उपचारांची गुणवत्ता वाढविण्यासाठी एनएबीएच आणि एनक्यूएएस प्रमाणित रुग्णालयांना दावा रक्कमेतून प्रति उपचार १० ते १५ टक्के प्रोत्साहन रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि तक्रार निवारणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती तसेच पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जन आरोग्य संरक्षण कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे. नागरिकांना योजनांविषयी माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी २४ तास कार्यरत टोल-फ्री कॉल सेंटर सेवा सुरू करण्यात आली असून. नागरिक या क्रमांकांवर संपर्क साधू शकतात - १५५३८८ / १८००२३३२२००, १४५५५ / १८००१११५६५ प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात दर्शनी भागात योजना कक्ष (किऑस्क) स्थापन करणे बंधनकारक असून या कक्षात नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी आरोग्यमित्र नियुक्त करण्यात आले आहेत. उपचार व सुविधा मिळण्यात अडचण आल्यास तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याची जबाबदारी जिल्हा समन्वयक, क्षेत्रीय व्यवस्थापक, अंमलबजावणी सहाय्य संस्था आणि जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे. त्यांच्या संपर्क क्रमांकांची माहिती प्रत्येक रुग्णालयात स्पष्टपणे प्रदर्शित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्य शासनाचे हे पाऊल नागरिकांना दर्जेदार, वेळेवर आणि पूर्णपणे कॅशलेस आरोग्यसेवा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अंगीकृत रुग्णालयांनी रुग्णांची विनाविलंब नोंदणी करून कॅशलेस उपचार द्यावेत. अशा पॅकेजमध्ये शस्त्रक्रिया, तपासण्या, योग्य दर्जाचे प्रत्यारोपण, औषधे, जेवण आणि एक वेळचा प्रवास खर्च यांचा समावेश असून कोणतेही शुल्क आकारता कामा नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

योजनेत समाविष्ट उपचार नाकारणे किंवा रुग्णांकडून रक्कम मागणे अशा तक्रारी आल्यास चौकशीनंतर संबंधित रुग्णालयावर दंड, निलंबन किंवा अंगीकरण रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल. राज्यातील सर्व नागरिक या एकत्रित योजनेतर्गत उपचारांसाठी पात्र आहेत. नागरिकांनी योजनांबाबत जागरूक राहून आपले हक्क बजावावेत आणि कोणत्याही अडचणीसाठी आरोग्यमित्र, जिल्हास्तरीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या समिती किंवा राज्य आरोग्य हमी सोसायटीशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# सरकारी वकील म्हणजे शिक्षा देणारी मशीन नव्हे; सर्वोच्च न्यायालयाची कठोर भूमिका

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/ सर्वोच्च न्यायालयाने 'चंदन पासी आणि इतर विरुद्ध बिहार राज्य' प्रकरणातील निकालाद्वारे फौजदारी न्यायप्रक्रियेत सरकारी वकिलांची भूमिका किती महत्त्वाची आहे हे स्पष्टपणे अधोरेखित केले आहे. या निकालात न्यायालयाने सांगितले की, सरकारी वकील हे केवळ राज्याच्या वतीने आरोपींवर शिक्षा ठोठावणारे व्यक्ती नाहीत; ते न्यायालयाचे अधिकारी आहेत आणि न्यायाच्या हितासाठी निष्पक्ष आणि स्वतंत्र राहणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

सदर प्रकरणात सत्र न्यायालयाने तीन आरोपींना हत्येच्या आरोपाखाली दोषी ठरवले होते, आणि पाटणा उच्च न्यायालयाने हा निर्णय कायम ठेवला होता. मात्र सर्वोच्च न्यायालयात खटला तपासला असता, आरोपींचे जबाब फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३१३ अंतर्गत योग्य प्रकारे नोंदवले गेले नव्हते, असे स्पष्ट झाले. आरोपींचे जबाब जवळजवळ सर्व एकसारखे होते आणि ही नोंदणी फक्त औपचारिकता म्हणून केली गेली होती. यामुळे खटल्याच्या निष्पक्षतेवर गंभीर परिणाम झाला, आणि न्यायालयाने ट्रायल कोर्टाबरोबरच सरकारी वकिलांवरही तीव्र नाराजी व्यक्त केली.न्यायालयाने आपले निरीक्षण करताना म्हटले की, आरोपींना शिक्षा व्हावी याच उद्देशाने सरकारी वकिलांनी कलम ३१३ अंतर्गत योग्य चौकशी न करता न्यायालयाला मदत करणे टाळले, हे आमच्यासाठी खूपच चिंताजनक आहे. न्यायालयाने पुढील मुद्द्यांवर भर दिला:

सरकारी वकील हे न्यायालयाचे अधिकारी आहेत: सरकारी वकिलांचे मुख्य कर्तव्य म्हणजे न्यायालयाच्या योग्य कार्यात सहाय्य करणे. ते फक्त आरोपींवर शिक्षा ठोठावण्याच्या उद्देशाने काम करू नयेत.

न्यायालयाला मदत करणे हे कर्तव्य: खटल्याच्या सुनावणीदरम्यान प्रक्रियात्मक त्रुटी ओळखणे आणि आरोपींचे जबाब योग्य प्रकारे नोंदवले जात आहेत याची काळजी घेणे हे सरकारी वकिलांचे महत्वाचे कर्तव्य आहे.

निष्पक्ष खटल्याची हमी: सरकारी वकिलांनी केवळ गुन्हेगारांना शिक्षा होईल याकडे लक्ष न देता, खटल्यात अशा कोणत्याही प्रक्रियात्मक त्रुटी राहू नयेत, जेणेकरून आरोपीला अन्याय होणार नाही, याची हमी द्यावी.न्यायालयाने आपल्या निरीक्षणांसाठी सोवरन सिंह प्रजापती विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि अशोक विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य, २०२४ या खटल्यांचा संदर्भ दिला, ज्यात सरकारी वकिलांच्या कर्तव्याचा सविस्तर विचार केला गेला होता.निकालानुसार, कलम ३१३ च्या उल्लंघनामुळे आरोपींना योग्य बचावाची संधी मिळाली नाही, ज्यामुळे खटल्याची निष्पक्षता बाधित झाली. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने तिन्ही आरोपींची शिक्षा रद्द केली आणि प्रकरण पुन्हा कलम ३१३ अंतर्गत योग्य चौकशीसह ट्रायल कोर्टाकडे परत पाठवले.

या निकालामुळे फौजदारी न्यायप्रक्रियेत सरकारी वकिलांची भूमिका आणि कर्तव्य किती महत्त्वाचे आहे हे पुन्हा अधोरेखित झाले. सरकारी वकिलांनी फक्त शिक्षा देणारे प्रतिनिधी म्हणून नव्हे, तर न्यायालयाचे अधिकारी म्हणून आपली भूमिका पार पाडावी, हा स्पष्ट संदेश देशभरातील न्यायव्यवस्थेला मिळाला आहे.

हा निर्णय फक्त आरोपींसाठीच नाही, तर संपूर्ण न्यायप्रक्रियेत पारदर्शकता, निष्पक्षता आणि न्यायालयाच्या विश्वासार्हतेसाठी मापदंड ठरतो. त्यामुळे, न्यायालयाने दिलेला हा संदेश फौजदारी प्रकरणांमध्ये सरकारी वकिलांनी न्यायप्रक्रियेत योग्य आणि संतुलित भूमिका बजावावी, याकडे लक्ष वेधतो.

# नर्सिंग विद्यार्थ्यांसाठी जर्मनीत प्रशिक्षण व करिअरची सुवर्णसंधी-वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/महाराष्ट्र आणि जर्मनीतील बाडेन-वुटेमबर्ग राज्यादरम्यान नर्सिंग क्षेत्रातील सहकार्य दृढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण संयुक्त करार करण्यात आला आहे.

यामुळे महाराष्ट्रातील नर्सिंग विद्यार्थ्यांनी जर्मनीत प्रशिक्षण घेऊन करिअरची सुवर्णसंधी उपलब्ध झाली असल्याचे वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि बाडेन-वुटेमबर्ग राज्याचे मंत्री मॅनफ्रेड लुखा यांनी सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे संयुक्त जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, वैद्यकीय शिक्षण आयुक्त डॉ. अनिल भंडारी, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सहसचिव डॉ. सुवर्णा खरात, यांच्यासह अर्चना बडे, धीरेंद्र रामटेके, तसेच बाडेन-वुटेमबर्ग राज्य येथील सामाजिक व्यवहार, आरोग्य आणि एकात्मता मंत्रालयाचे उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ तसेच वैद्यकीय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, या करारानुसार भाषा प्रशिक्षण, प्रगत कौशल्य विकास, प्रमाणपत्र मान्यतेची प्रक्रिया सुलभ करणे, तसेच जर्मनीत नोकरी स्वीकारणाऱ्या नर्सेसच्या सन्मान व संरक्षणासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. उच्च दर्जाच्या आरोग्यसेवेच्या दृष्टीने प्रशिक्षित नर्सिंग



### महाराष्ट्र-बाडेन वुटेमबर्ग राज्यांदरम्यान संयुक्त करार

मनुष्यबळाची निर्मिती हा या कराराचा केंद्रबिंदू असणार आहे. दोन्ही राज्यांतील नर्सिंग शिक्षण संस्था, विद्यापीठे व प्रशिक्षण केंद्रांदरम्यान विद्यार्थी-प्राध्यापक आदानप्रदान, संयुक्त प्रशिक्षण, अभ्यासदौरे आणि संशोधन उपक्रम राबवून शिक्षणाची गुणवत्ता आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा उद्देश आहे.

मंत्री मॅनफ्रेड लुखा म्हणाले, दोन्ही राज्यादरम्यान नर्सिंग व आरोग्यसेवा क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे. कौशल्याधारित आरोग्यसेवेचा विस्तार करणे, संशोधनाला चालना देणे तसेच परदेशी रोजगार संधी उपलब्ध करणे यावर विशेष भर दिला जाणार आहे. या सहकार्यामुळे तरुणांना विदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळ अधिक प्रशिक्षित व सक्षम होईल.

बाडेन-वुटेमबर्ग राज्याच्या प्रतिनिधी मंडळाने ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२५ या कालावधीत महाराष्ट्र राज्याचा दौरा केला होता. नर्सिंग क्षेत्रातील सहकार्य वाढवणे, प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे व कौशल्य विकासासाठी नवीन मार्ग उभारणे हा या भेटीचा प्रमुख उद्देश होता.या उपक्रमामुळे महाराष्ट्र व बाडेन-वुटेमबर्ग राज्यांमधील आरोग्यसेवा व नर्सिंग क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय भागीदारी अधिक बळकट होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813